# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापन विभाग आढावा बैठक संपन्न**

दिनांक ०७ जून २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त (मुख्यालय) रवि पवार, उपायुक्त डॉ. सचिन बांगर यांच्या उपस्थितीत पावसाळ्यापूर्वी आपत्ती व्यवस्थापन विभागाची आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस कार्यकारी अभियंता, सर्व प्रभाग अधिकारी, सहाय्यक आयुक्त, स्वच्छता निरीक्षक व कनिष्ठ अभियंता उपस्थित होते.

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पावसाळापूर्व नालेसफाईची कामे ही १००% पूर्ण करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच शहरात सखल भागात पावसाळ्यात पाणी साचू नये त्यासाठी सक्शन पंप बसवून घेऊन ते पंप सुरू असल्याची खात्री करून घेण्याचे निर्देश देण्यात आले. नाले/गटारावरील तुटलेली झाकणे ही पावसाळा पूर्व नव्याने बसवून घेण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच रस्ते खोदाईची नव्याने परवानगी न देण्याचे निर्देश देण्यात आले. आपत्ती व्यवस्थापन केंद्र प्रत्येक प्रभागात सुरू करून त्यासाठी आवश्यक त्या संख्येत कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याचे निर्देश देण्यात आले. १५ जून पासून शाळा सुरू होणार असून त्यापूर्वी शाळेची सफाई, स्वच्छता व इतर सुविधांची कामे पूर्ण करून प्रत्येक शाळेची पाहणी करण्याचे निर्देशित करण्यात आले. पावसाळा सुरू होणार असून साथीच्या रोगांच्या उपचारासाठी वैद्यकीय आरोग्य विभागाने औषधांचा पुरेसा साठा करण्याचे निर्देश देण्यात आले. महापालिका क्षेत्रातील झाडांच्या फांद्यांची छाटणी पूर्ण करून त्वरित त्या फांद्या उचलून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. पावसाळा पूर्व रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम हे युद्ध पातळीवर पूर्ण करून घेण्याचे निर्देश सदर आढावा बैठकीत देण्यात आले.